मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ

फौजदारी शाखा प्रकरणे

[जेल अपिले]

हायब्रीड कॉन्फरन्सिंग सुविधेविषयी

मा. न्या. श्रीमती व्ही. व्ही. कंकणवाडी

व

मा.न्या. श्री. अभय एस. वाघवसे

यांच्या न्यायालयाच्या सूचना

परिचय

न्यायव्यवस्थेद्वारे मा. न्यायालयात हायब्रीड व्हिडीओ कॉन्फरंसिंग सुविधा अंमलात आणून एक मोठे क्रांतीकारी पाऊल उचलले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानेही पुढाकार घेत सर्व मा. न्यायालयांमध्ये व्हिडीओ कॉन्फरंसिंग सुविधा प्रदान केली आहे.

मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे मा. न्या. श्रीमती व्ही. व्ही. कंकणवाडी व मा.न्या. श्री. अभय एस. वाघवसे यांच्या संकल्पना आणि मार्गदर्शनानुसार एक पथदर्शक प्रकल्प म्हणून बंद्यांना हायब्रीड व्हिडीओ कॉन्फरंसिंग सुविधेत प्रवेशित होणे शक्य करण्याचे प्रस्तावित आहे. मात्र, हा प्रकल्प या न्यायालयापुरताच मर्यादित असणार आहे; तसेच, व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे सुनावणीत सहभागी होणे हे बंद्यांसाठी ऐच्छिक राहील.

बंद्याचे प्रकरण मा. न्यायालयासमोर सुनावणीस आल्यानंतर बंद्यास आभासी अधिप्रवेश [वर्च्युअल एक्सेस] देण्यात येईल.

औरंगाबाद खंडपीठातील आभासी सुनावणीत अधिप्रवेश मिळवण्यासाठीची पद्धत:

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर [https://bombayhighcourt.nic.in) खाली दर्शविल्याप्रमाणे व्हर्चुअल हिअरिंग या लिंकवरील औरंगाबाद बटनावर जावे :



२. 'औरंगाबाद बेंच' वर क्लिक केल्यानंतर आपणास खंडपीठाच्या प्रत्येक न्यायालयाच्या न्यायदान कक्षाची नावे आणि चित्रे दर्शविलेल्या वेबपृष्ठावर नेले जाईल.

३. अपेक्षित न्यायदान कक्षाच्या क्रमांकाचा किंवा मा. न्यायाधीशांच्या नावाचा शोध घ्या आणि चित्र किंवा नावावर क्लिक केल्यावर आपण आपोआप संबंधित न्यायदान कक्षाच्या झूम मंचाच्या व्हिडीओ कॉन्फरंसिंग अधिप्रवेशाकडे निर्देशित केले जाल . [उदा. न्यायालय क्र. १६ / नावावर क्लिक करा.]

४. आपण जर आपल्या संगणकावर किंवा मोबाईलवर झूम अनुप्रयोग [एप्लिकेशन] स्थापन केले नसल्यास आपण खाली दिल्याप्रमाणे स्थापित करू शकता. पर्याय म्हणून आपण ब्राऊजरद्वारेही सहभागी होऊ शकता.

अ. आपली इच्छा असल्यास आपण झूम अनुप्रयोग आपल्या संगणकावर किंवा मोबाईलवर गुगल प्ले स्टोअर्स द्वारे स्थापित करू शकता.

ब. डेस्क टॉप पी सी साठी:

'http://zoom.us/client/latest/ZoomInstaller.exe' या लिंकवर जा.

क. डाउनलोड पूर्ण झाल्यावर, अनुप्रयोग आपल्या पीसीवर स्थापित करा.

ड. आपण मोबाईल फोन वापरत असल्यास, आपण 'ZOOM Cloud Meetings' प्ले स्टोअर्स वरून स्थापित करू शकता.

५. अनुप्रयोग उघडल्यानंतर आपण साईन इन केलेले असल्यास join वर क्लिक करावे.

६. तसेच आपण ब्राऊजरद्वारे थेट सहभागी होऊ शकता. ब्राऊजरद्वारे सहभागी होण्यासाठी सर्वप्रथम झूम अनुप्रयोगाद्वारे

पॉप-अप विंडो उघडणे रद्द करा. त्यानंतर ब्राऊजर वर दिलेल्या Launch Meeting बटनावर क्लिक करा.

७. निवडलेल्या न्यायालयाच्या त्यादिवशीच्या प्रकरण यादी [कॉज लिस्ट] मधून प्रकरण क्रमांक ज्यात आपण आभासी पद्धतीने उपस्थित होत आहात, त्याचा यादी क्रमांक आपल्या नावासहित एन्टर करावा. यामुळे न्यायालयाच्या कर्मचा-यांस संबंधित प्रकरण सुनावणीस आल्यानंतर आपल्याला योग्य वेळी आभासी सुनावणीत हजर राहण्यासाठी आपल्याला अनुमती देऊन प्रवेशित करता येईल.

८. आपण जर मध्यवर्ती कारागृहातून जोडलेले असाल तर कृपया **९०१ –हर्सूल जेल औरंगाबाद** असे टाईप करावे.

९. जर बदलला नसल्यास आपला मिटिंग पासवर्ड १२३४ असाच राहील.

आवश्यक सूचना

१. बंदी आभासी पद्धतीने न्यायालयासमोर येणार असल्याने बंद्यास व्हिडीओ कॉन्फरंसिंगमध्ये प्रवेशित करण्याआधी सुयोग्य वेष करण्यास सांगावे.

२. आपण व्हिडीओ कॉन्फरंसिंगमध्ये सहभागी होत असताना कृपया गर्दी आणि गोंगाटपूर्ण जागा टाळाव्यात जेणेकरून न्यायालयाची न्यायदान प्रक्रिया प्रभावित होणार नाही.

३. म्युट मोड मध्येच सहभागी होण्याचे सुचविले जाते आणि जर बंद्यास काही निवेदन करावयाचे असल्यास , बंद्यातर्फे तुरुंगातील व्हिडीओ कॉन्फरंसिंग परिचालक टेक्स्ट संदेश पाठवून अनुमती घेईल. त्यानंतर, अशी अनुमती मिळाल्यानंतरच बंद्यास बोलण्याची परवानगी दिली जाईल.
